भारती विद्यापीठ पोलीस ठाणे
दिनांक-२३/१२/२०१७

# प्रेसनोट

## बसमध्ये गर्दीचा फायदा घेवून चोरी करणारे अटकेत

**२०२ ग्रॅम वजनाचे कि.रु-५,७४,३००/-चे सोन्याचे दागिने जप्त**

भारती विद्यापिठ पोलीस ठाणे गु.रजि.नं-५४५/२०१७ भांदवि क.३७९ दाखल गुन्हयाची हकीकत अशी की, फीर्यादी महीलानामे सौ कमल बाबुराव वाकुर्डेकर वय.५५ वर्ष धंदा-गृहीणी रा.मु.पो.बोरी बुद्रुक ता जुन्नर जि.पुणे या दिनांक १९/११/२०१७ रोजी १६.०० वा ते १७.०० वा दरम्यान त्यांची मुलगी स्मिता सावंत हिचे नवी सांगवी येथील घरातुन निघुन मुलगा सचिन याचे चैतन्यनगर धनकवडी पुणे येथील घरी जाणेकरीता पिंपळे गुरव बस स्टॉप येथुन बसने पिपळेगुरव ते भारती विदयापीठ बसस्टॉप असा बस प्रवास करताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे पर्सची बाहेरील चेन व पर्समधील आतील कप्याची चेन उघडुन त्यामधील ठेवलेल्या बारीक पर्समधील ३५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र व रोख रक्कम १००० हे त्यांची नजर चुकवुन लबाडीच्या इरादयाने चोरुन नेले आहेत म्हणुन त्यांनी त्या अज्ञात चोरटयाविरुध्द तक्रार दिलेली आहे.

दिनांक १५/१२/२०१७ रोजी भारती विदयापीठ पोलीस ठाणे हद्दीत तपास पथक पेट्रोलिंग करीत असताना माहीती मिळाली की, पीएमटी बस मधुन प्रवास करणारे महीला प्रवांशाच्या पर्समधील सोन्याचे दागिने चोरी करणारे एक महीला व एक पुरुष हे आता भारती विदयापीठ समोरील पुणे सातारा रोडवरील बसस्टॉप थांबलेले असुन त्यांनी सुमारे २५ दिवसापुर्वी पीएमटी बसमधुन प्रवास करणारे एका महीलेच्या पर्समधील सोन्याचे दागिन्याची चोरी केलेली आहे अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने सदरची माहीती वरिष्ठांना कळवून त्यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस उप-निरीक्षक गायकवाड व तपास पथकातील कर्मचारी यांनी बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन वॉच केला असता बातमीत मिळालेले ठिकाणी बातमीतील वर्णनाचे एक इसम व एक महीला थांबले असल्याचे दिसल्याने त्यांना वरील स्टाफने त्यांना जागीच पकडुन त्यांना आहे त्या स्थितीत ठेवुन त्यास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव पत्ता **१) विनोद शामराव साळुंखे वय.५० वर्ष सध्या रा. कोळी मिल साईनगर अप्पर इंदीरानगर बिबवेवाडी पुणे मुळ रा. मु.पो अंजाळ ता.जत जि.सांगली व महीलेने तिचे नाव पत्ता २).शामला विनोद साळुंखे वय.४६ वर्ष सध्या रा. कोळी मिल साईनगर अप्पर इंदीरानगर बिबवेवाडी पुणे मुळ रा. मु.पो अंजाळ ता.जत जि.सांगली** असे असल्याचे सांगितलेनंतर पोलीस ठाणे येथे आणुन विश्वासात घेवुन तपास केला असता तपासादरम्यान त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केल्याने,दाखल गुन्हयात त्यांना दिनांक-१५/१२/२०१७ रोजी अटक केली असुन **तपासादरम्यान त्यांचेकडुन चोरी केलेले २०२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, एकूण कि.रु-५,७४,३००/- चा चोरीचा माल हस्तगत केलेला आहे.त्यांचेकडून भारती विद्यापिठ,पो.ठाणेचे एकुण ५ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.** त्याचेकडे अधिक तपास पोलीस उप-निरीक्षक श्री शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो, अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, मा.श्री डॉ.प्रविण मुंढे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री कमलाकर ताकवले सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री राजकुमार वाघचवरे सो, पोलीस निरीक्षक(गुन्हे),भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री शिवदास गायकवाड,पो.कर्मचारी प्रदीप गुरव, विनोद भंडलकर,गणेश सुतार,समिर बागसिराज,योगेश सुळ,बाबा नरळे, सुमित मोघे, यांचे पथकाने केलेली आहे.**